www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार

दै. युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे
वर्ष : २ अंक : १७२ वा शनिवार दि.०८ मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514




# जागतिक महिला दिन

## महिला दिनाचा इतिहास जाणून घ्या...

जागतिक महिला दिन हा जगभर उत्साहात साजरा केला जातो. युनायटेड नेशन्सने ८ मार्च १९७५ ला महिला दिवस साजरा करण्याची सुरुवात केली होती. हा दिवस महिलांच्या हक्कासाठी जागरुकता निर्माण करण्यासाठी हा दिवसांची सुरुवात झाली होती. या दिवशी महिलांसाठी विविध कार्यक्रमाचे नियोजन केले जाते. सर्वच क्षेत्रामध्ये महिलांचा सन्मान केला जातो. पण हा दिवस का निवडला त्यामागचे नेमके कारण काय? याबद्दल पुर्ण माहिती या लेखांमध्ये तुम्हाला मिळणार आहे. आता महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करतात. परंतु पुर्वी असे नव्हते. माहिलांना त्यांच्या दैनंदिन जीवनातील समातेसाठी संघर्ष करावा लागत होता. यामुळेच 8 मार्च रोजी साजरा केला जाणारा आंतरराष्ट्रीय महिला दिन इतका महत्त्वाचा ठरतो. प्रत्येक क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या महिलांचा या दिवशी सन्मान केला जातो. 1908 मध्ये 15 हजार महिलांनी न्युयॉकमध्ये रस्त्यावर उतरत एक मोर्चा काढला होता. महिलांना मतदानाचा अधिकार, कमी तासांची नोकरी आणि चांगल्या पगाराची नोकरी मिळावी. या तीम प्रमुख गोष्टींच्या मागण्यासह हा मोर्चा काढण्यात आला. रशियन महिलांनी 1917 मध्ये आंदोलन केले होते. तर युरोपमध्येही माहिलांनी 8 मार्चला शांतीचे समर्थन करण्यासाठी रॅली काढली होती. दोन वर्षानंतर 1913 मध्ये जागतिक महिला दिनाची तारीख बदलून 8 मार्च करण्यात आली आणि तेव्हापासून आजचा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो.









# आज आम्ही चालवणार 'वंदे भारत'

## पश्चिम रेल्वेवर मालगाडीची धुरा मीराबाईंच्या हाती

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**





कॅरल डिसोझा



मीराबाई मीना



उत्कर्षा शर्मा

मुंबई : जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने शनिवारी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथून शिर्डीला जाणाऱ्या वंदे भारतचे सारथ्य महिलांकडे सोपविले जाणार आहे. रेल्वे चालविण्याचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या सुरेखा यादव ही गाडी चालविणार आहेत. त्यांच्या दिमतीला चार महिला तिकीट तपासणीस आणि एक ट्रेन गार्ड असा ताफा असेल. वंदे भारत गाडी ही शनिवारी सकाळी ६ वाजून २० मिनिटांनी शिर्डीला रवाना होईल. गेल्या दोन वर्षापासून सुरेखा यादव यांच्या हाती या वंदे भारत ट्रेनचे सारथ्य आहेत.

**४५ डब्यांची मालगाडी**

रेल्वेमध्ये प्रवासी वाहतूक ट्रेन चालविण्याअगोदर मालवाहतूक गाडी चालविण्याचा अनुभव महत्त्वाचा ठरतो. शनिवारी पश्चिम रेल्वेच्या ३ लोको पायलट वसई रोड ते बडोदादरम्यान ४५ डब्यांची मालगाडी चालविणार आहेत. गाडीमध्ये १५०० टन वजन असते. मालगाडीचे सारथ्य करण्याचे कसब असलेल्या पश्चिम रेल्वेच्या लोको पायलट मीराबाई मीना आणि त्यांच्या सहायक लोको पायलट उत्कर्षा शर्मा आणि कॅरल डिसोझा करणार आहेत.

# एनआरआय सागरी (उलवा) पोलीस ठाणे परिसरात अनोळखी मृतदेह आढळला

दैनिक युवक आधार
पनवेल प्रतिनिधी

एनआरआय सागरी (उलवा) पोलीस ठाणे, नवी मुंबई हद्दीत अनोळखी बेवारस पुरुषाचा मृतदेह सापडला खाडीतील पाण्यामध्ये उताणे स्थितीत तरंगत असतांना मिळून आला त्यास उपचारार्थ उपजिल्हा रूग्णालय, पनवेल येथे घेवून गेले असता, तेथील वैदयकीय अधिकारी यांनी तपासून दाखलपूर्व 12:30 वा. मयत घोषित केले आहे. तरी सदर अनोळखी पुरूषाचा अज्ञात कारणास्तव पाण्यात बुडून मृत्यु झाला आहे तरी वय अंदाजे 40 ते 45 वर्ष असून वर्णन अनोळखी हिंदू पुरुष, वय अंदाजे 40 ते 45 वर्ष, उंची 5.3 इंच, बांधा मध्यम, रंग - सावळा, केस - काळे मध्यम, डोळे डावा डोळा बंद स्थितीत, तोंड बंद, नाक - लहान, दाढी पांढरी लहान, नेसनीस काळया रंगाचा फुल बाहयाचा टी षर्ट त्यास पांढ-या रंगाच्या आडव्या लाईनींग व काळया रंगाची फुल पॅन्ट आणि पॅन्टच्या खिशात स्टिलची चावी व निळया रंगाचे छोटे कटर, कमरेस काळा धागा बांधलेला. असून सदर व्यक्ती ओळखत असल्यास तपास अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक अजित कणसे, मो. नं. 8669789100 किंवा अनिल राजुरे-पोलीस उपनिरीक्षक नेम-उलवा पोलीस ठाणे मो. न 8600008869 यांच्याशी संपर्क साधावा असे आव्हान एन आर आय सागरी उलवे पोलीस ठाणे यांनी केले आहे



# उरण पंचायत समितीमध्ये दिव्यांगांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चासत्र संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर**
**उरण रायगड**

रायगड जिल्ह्यामधील उरण पंचायत समितीमध्ये ७ मार्च २०२५ रोजी उरण तालुक्यामधील सर्व ग्रामसेवकांच्या उपस्थितीत आणि उरणच्या बीडिओ साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार दिव्यांगांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर चर्चासत्र २८ फेब्रुवारी २०२५ रोजी उरण तालुक्यामध्ये आम सभा घेण्यात आली होती या सभेमध्ये दिव्यांग सामाजिक संघटनेने काही त्यांच्या समस्या मांडल्या होत्या. यातील पंचायत समिती अंतर्गत असलेल्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी ग्रामसेवकांच्या उपस्थितीत सभा घेण्यात आली होती.या सभेमध्ये दिव्यांग सामाजिक संघटनेचे अध्यक्ष महेंद्र म्हात्रे आणि उपाध्यक्ष राजेंद्र पाटील यांनी संघटनेमार्फत काही प्रश्न मांडले. त्या प्रश्नांवर प्रत्यक्ष सभेत सविस्तर चर्चासत्र भरवण्यात आले. आणि सदर चर्चा चांगल्या संवादाने घडून आली. यामध्ये दिव्यांग सामाजिक संघटनेने पुढील प्रश्न मांडले त्यामध्ये प्रामुख्याने, , १)उरणपंचायत समितीमार्फत ग्रामपंचायत स्तरावर दिव्यांगांसाठी वर्षातून दोन वेळा 'दिव्यांग आम सभा' होणे आवश्यक आहे. त्यामुळे तालुक्यातील दिव्यांगांना आपल्या समस्या मांडता येतील.२) समाज कल्याण विभाग आणि पंचायत समिती विभागा मधील दिव्यांग योजना पोहोचवण्याची जबाबदारी प्रत्येक

**पान २ वर**









# राज्यस्तरीय "सम्यक कार्यसम्राट" आदर्श शिक्षक पुरस्कार शेख अब्दुल रहीम यांना जाहीर !

**दैनिक युवक आधार**
**संभाजीनगर वार्ताहर**



: कास्ट्राईब कर्मचारी महासंघ महाराष्ट्र राज्य प्रणित कास्ट्राईब शिक्षक संघटना जिल्हा, कोल्हापूरच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय "सम्यक कार्यसम्राट" आदर्श शिक्षक पुरस्कार हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर यांना जाहीर झाला आहे. राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीच्या बैठकीत एकमताने निवड करण्यात आली आहे. नुकतीच नावे जाहीर केली आहे. यामध्ये निवड समितीने शेख अब्दुल रहीम सर यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन राज्यस्तरीय "सम्यक कार्यसम्राट" आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड केली आहे. हा पुरस्कार कोल्हापूर येथे महिला दिनानिमित आयोजित शिक्षक मेळावा आणि सन्मान सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरुप स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पहार असे असेल. पुरस्कार स्विकारण्यासाठी शनिवार दि. 08 मार्च 2025 रोजी दुपारी 12.00 वा. श्रीराम मंगल कार्यालय, चिमगाव रोड, मुरगूड शिक्षक मंच,

**पान २ वर**

## संपादकीय

# प्रशासक राजवट संपवा हो..!

महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित याचिकांची पुढील सुनावणी ६ मे रोजी ठेवण्यात आल्याने करोनाकाळापासून रखडलेल्या या निवडणुका आता दिवाळीनंतरच होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल अद्याप आलेला नसल्याने अजून तरी या निवडणुका शक्यतेच्या पातळीवरच आहेत. सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी निवडणुकांच्या संदर्भातील याचिका पहिले सत्र संपण्यास दोन मिनिटांचा अवधी असताना पुकारल्या गेल्या. तेव्हा इतर मागासवर्गीय (ओबीसी) आरक्षणाबाबत योग्य माहिती प्राप्त न झाल्याने न्यायालयाने ही सुनावणी पुढे ढकलली. मे महिन्यात सुनावणी होऊन लगेचच निकाल लागला नाही तर सुट्टीनंतर सुनावणी पुढे जाऊन जुलै उजाडेल. मुंबईत प्रभागांची संख्या २२७ की २३६ हा मुद्दा निकालात निघाल्यावर राज्य निवडणूक आयोगाला तयारीसाठी किमान ९० दिवस लागतील. ऑक्टोबरात दिवाळी. परिणामी निवडणुकांना नोव्हेंबर-डिसेंबर उजाडू शकतो. मुंबई मनपात सुरू झालेल्या प्रशासकांच्या राजवटीस येत्या शुक्रवारी तीन, तर ठाणे मनपातील प्रशासकांच्या राजवटीस उद्या, गुरुवारी तीन वर्षे पूर्ण होत आहेत. कल्याण-डोंबिवली, कोल्हापूर, संभाजीनगर या मनपांचा कारभार प्रशासकांच्या हातात जाऊन पाच वर्षे झाली. राज्यातील सर्व २९ महानगरपालिकांमध्ये सध्या प्रशासकीय राजवट लागू आहे. काही ठरावीक नगरपंचायती वगळता २३२ नगरपालिका, सर्व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या प्रशासकांच्या ताब्यात आहेत. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सुमारे ३० ते ३५ हजार जागा रिक्त आहेत. करोना साथीमुळे तेव्हा होऊ घातलेल्या निवडणुका लांबणीवर पडणे स्वाभाविक होते. पुढे दोन वर्षांत जगातील सारे जनजीवन सुरळीत झाले, पण निवडणुकांना मुहूर्त मिळाला नाही. त्यासाठी आधी सत्तेत असलेल्या महाविकास आघाडीला आणि नंतर सत्तेत आलेल्या महायुतीच्या राज्यकर्त्यांना जबाबदार धरावे लागेल. निवडणुका सोयीच्या नसल्याने महाविकास आघाडीच्या सरकारच्या काळात प्रभाग रचनेचा घोळ घालण्यात आला. तेव्हाच नेमके इतर मागासवर्गीयांचे राजकीय आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने रद्द केल्याने त्याची प्रतिक्रिया उमटली.

राज्यात सत्ताबदल झाल्यावर महायुती सरकारने ओबीसींची आकडेवारी जमा केली. मध्य प्रदेशच्या निकालाआधारे राज्यातील ओबीसींचे राजकीय आरक्षण पुनर्स्थापित झाले. पण प्रभाग आरक्षण, त्याची संख्या, ९२ नगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये ओबीसी आरक्षण हे विविध मुद्दे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. जून २०२२ मध्ये सत्तेत आलेल्या एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारलाही निवडणुका बहुधा सोयीच्या नव्हत्या. त्यांचाही कल निवडणुका पुढे ढकलण्याकडेच होता. महाविकास आघाडी सरकारच्या काळात झालेल्या प्रभाग रचनेत तसेच बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीत महायुती सरकारने बदल केला होता. सत्ताधाऱ्यांना सोयीच्या नसल्याने लांबणीवर पडलेल्या निवडणुकांना अद्यापही मुहूर्त मिळालेला नाही. निवडणुका लांबणीवर पडण्याबाबत राजकीय नेते न्यायालयाकडे अंगुलिनिर्देश करीत असले तरी नेतेमंडळीही तेवढीच जबाबदार आहेत. मुंबई, ठाण्यात १९८०च्या दशकात राजकीय कारणावरूनच अनेक वर्षे प्रशासकीय राजवट होती. गेल्या नोव्हेंबरमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला विक्रमी यश मिळाल्याने लगेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील, अशी शक्यता वर्तविली जात होती. पण तीही फोल ठरली. मुंबईसारख्या शहरात महानगरपालिकेत तीन-तीन वर्षे प्रशासकीय राजवट असणे हे केव्हाही शोभादायक नाही. पालिकांमध्ये लोकप्रतिनिधींची राजवट नसल्याने स्थायी समिती, त्यातील टक्केवारी, नगरसेवकांची चिरीमिरी याला आळा बसल्याचा दावा एका बाजूला करण्यात येत असला तरी दुसरीकडे नगरसेवकांची राजवट नसल्याने लोकशाहीत आपला लोकप्रतिनिधी निवडण्याचा नागरिकांचा हक्क डावलला जात आहे. लोकप्रतिनिधी नसल्याने नोकरशाहीच्या हाती सारी सत्ता एकवटते, यातून नोकरशाहीची मग्रुरी वाढते. अधिकाऱ्यांना मंत्रालयातून येणाऱ्या आदेशांवरून निर्णय घ्यावे लागतात. हे मुंबई महानगरपालिकेत घडले, तर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका न झाल्याने लोकप्रतिनिधींना तसेच तेथील नागरिकांना कोणत्याही कामांकरिता अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यासाठी जिल्हा किंवा तालुका मुख्यालय गाठावे लागते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरात लवकर होणे हा एकच उपाय यावर आहे. तीन ते पाच वर्षे निवडणुका न झाल्याने राजकीय कार्यकर्त्यांची कुचंबणा होते. या वर्षाअखेर तरी निवडणुका पार पाडून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकप्रतिनिधींची राजवट प्रस्थापित व्हावी ही अपेक्षा.

# स्मार्ट इनोव्हेशन चॅलेंजमध्ये पनवेल केटीआयने पटकावला प्रथम क्रमांक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

विवेकानंद एज्युकेशन सोसायटीच्या बिजनेस स्कूल तर्फे आयोजित करण्यात आलेल्या स्मार्ट इनोव्हेशन चॅलेंजमध्ये पनवेल येथील कोहिनुर टेक्निकल इन्स्टिट्यूट अर्थात केटीआयच्या शाखेच्या 'मोशन सेन्सर' या प्रोजेक्टने प्रथम क्रमांक पटकाविला.

या स्पर्धेमध्ये बारा नामांकित कॉलेजेसनी सहभाग घेतला होता. याचबरोबर केटीआय संस्थेच्या विविध शाखांमधून देखील या स्मार्ट इनोव्हेशन चॅलेंजसाठी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेले प्रोजेक्ट्स ठेवण्यात आले होते. या स्पर्धेमधून केटीआयच्या पनवेल शाखेतील 'मोशन सेन्सर' या प्रोजेक्ट ला प्रथम क्रमांक मिळाला व के.टी.आय.ठाणे शाखेतील *टेक ट्रेसर* या प्रोजेक्ट ला द्वितीय क्रमांक मिळाला तसेच दादर शाखेतील *फूटस्टेप पॉवर जनरेटर* या प्रोजेक्टला तृतीय क्रमांक मिळाला. उत्तम सादरीकरण व नाविन्यता याचा विचार करून प्रोजेक्टची निवड करण्यात आली. प्रोजेक्टमध्ये प्राविण्य मिळवण्याचे कोहिनूर टेक्निकल संस्थेचे हे सलग तिसरे वर्ष असून हॅटट्रिक विक्रम प्राप्त केले आहे. पनवेल शाखेचा प्रोजेक्ट व्यवस्थापक सीमा नाईक आणि शिक्षक सुरेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमेश मुने, सतीश साठे, निखिल गावडे, रोहित पाटील, विघ्नेश घाडी, सादिक मुझावर, अनिकेत पाटील यांनी सादर केला होता.

केटीआयच्या सर्व शाखांमध्ये अभ्यासाबरोबरच अशा प्रकारचे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच लक्ष केंद्रित केले जाते तसेच त्यांना बाहेरील इतर स्पर्धांमध्ये देखील भाग घेण्यासाठी संधी उपलब्ध करून दिल्या जातात. याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. सर्व कॉलेजेस मधून के .टी आय च्या शाखांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळाल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे व या स्पर्धेच्या युगामध्ये अशा प्रकारचे यश संपादन करणे खरोखरच कौतुकास्पद आहे अशा शब्दात पालकांनी मनोगत व्यक्त करून केटीआय संस्थेचे आभार मानले.



# स्त्री, तुझे अस्तित्व तुझ्या हातात!

आजच्या स्वार्थी आणि धोकादायक जगात स्त्री आणि मुलींना जपणं हे अधिक कठीण होत आहे. विश्वास ठेवल्या जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडून धोका संभवतो. या जगात आता प्रेताच्या टाळूवरचं लोणी खाणारी औलाद वाढली आहे. हे लोक स्वार्थासाठी कोणाचाही विश्वासघात करतात, भावनांशी खेळतात आणि स्त्रीच्या अस्मितेचा बाजार मांडतात. अशा परिस्थितीत स्त्रीने स्वतःच आपल्या अस्तित्वासाठी लढायला हवं. स्त्रीत्व हे केवळ एक ओळख नाही, तर ती एक ताकद आहे.

**स्त्रीत्वाचा अपमान करणारी संस्कृती**

आज सोशल मीडियावर, चित्रपटांमध्ये आणि मालिका विश्वात स्त्रीत्वाचा बिभत्स बाजार मांडला जात आहे. जुन्या काळी स्त्रीला एक आदराचे स्थान होते, पण आता मनोरंजनाच्या नावाखाली तिच्या अस्मितेचा बाजार मांडला जातो. वेब सिरीज, सिनेमे, गाणी आणि मालिका यामध्ये स्त्रीला केवळ एक उपभोग्य वस्तू म्हणून दाखवले जात आहे. "प्रेम, आकर्षण, स्वातंत्र्य" या संकल्पनांचा गैरवापर करून नव्या पिढीला चुकीच्या मार्गावर नेले जात आहे.

**स्वतःच्या सुरक्षेची जबाबदारी स्त्रीने घ्यायलाच हवी**

आज 'लव्ह जिहाद'सारखी विषारी षडयंत्रं समाजात वाढत आहेत. प्रेमाच्या नावाखाली, विश्वास जिंकून, अनेक मुलींना जाणीवपूर्वक फसवलं जात आहे. लग्नाच्या भूलथापांना बळी पडून अनेक स्त्रिया स्वतःच्या संस्कृतीपासून तुटून जात आहेत. नंतर त्यांच्या वाट्याला येते अत्याचार, छळ आणि दुर्दैवी मृत्यू. म्हणूनच, कोणावरही अंधविश्वास ठेवण्यापूर्वी प्रत्येक स्त्रीने सावधगिरी बाळगली पाहिजे.

**संस्कार आणि स्वाभिमान यांचा वारसा जपला पाहिजे**

आई-वडिलांचे संस्कार, आपल्या मातीतले मूल्य, हे विसरता कामा नये. प्रत्येक स्त्रीने लक्षात ठेवावे – जग कोणाचेही ऐकत नाही, पण कर्तृत्ववान माणसांचे आदराने नाव घेत असते. आपल्या अस्तित्वाची, कुटुंबाची, समाजाची आणि संस्कृतीची जबाबदारी स्त्रीने स्वतःच्या खांद्यावर घ्यायला हवी. तिला कोणाच्याही आंधळ्या प्रेमात पडायचे नाही, तर ती स्वतःला घडवायचे आहे.

स्वतःला घडवा, स्वतःला मजबूत करा

स्वावलंबी बना, शिकून मोठे व्हा. कोणत्याही सोशल मीडियाच्या आभासी जाळ्यात अडकू नका. बाहेरच्या जगाकडे 'माझं काहीही वाईट होणार नाही' या भ्रमात बघू नका. प्रत्येक गोष्टीवर विचार करा, स्वतःच्या आई-वडिलांचा विचार करा. तुमच्या निर्णयांवरून तुमच्या कुटुंबाची प्रतिष्ठा, संस्कृती आणि संपूर्ण समाजावर परिणाम होतो हे विसरू नका. स्त्रीत्वाचा सन्मान आणि अस्तित्वाचे रक्षण स्त्री ही देवी आहे, पण तिने गरज पडल्यास रणरागिणी बनायला हवे. गरज पडल्यास राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी यांसारख्या योद्धा बनायला हवे. आज स्त्रियांना कोणावर किती विश्वास ठेवायचा, कोणते निर्णय घ्यायचे आणि कोणत्या मार्गाने जायचे, याचा विचार स्वतःच करावा लागेल.

**स्त्री, तुला तुझ्या अस्तित्वासाठी झगडावेच लागेल!**

कोणाच्याही भुलथापांना बळी न पडता स्वतःच्या संस्कृतीचा, आत्मसन्मानाचा आणि कुटुंबाच्या प्रतिष्ठेचा विचार करायला हवा. कोणत्याही मोहात न पडता, योग्य निर्णय घेऊन आपल्या जीवनाचे सोने करावे.



लेखक
**आसाराम वीरकर,**
उपसंपादक, दैनिक 'युवक आधार'

## राज्यस्तरीय "सम्यक कार्यसम्राट" आदर्श शिक्षक पुरस्कार शेख अब्दुल रहीम यांना जाहीर!

पान १ वरुनता. कागल जिल्हा कोल्हापूर येथे सहपरिवार उपस्थित राहावे, असे आवाहन निवड पत्राद्वारे करण्यात आले. निवड पत्रावर कास्ट्राईब शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य संघटनेचे सरचिटणीस सतिष कांबळे सर यांची स्वाक्षरी आहे. शेख अब्दुल रहीम सर हे व्यवसायाने शिक्षक आहेत. ते हॅप्पी टू हेल्प फॉउंडेशनद्वारे विद्यार्थी-शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी अहोरात्र प्रयत्नशील आहेत. विद्यार्थी-शिक्षकांसाठी वर्षभर अनेक उपक्रम राबवित असतात. कोणताही कार्यक्रमास पुष्पगुच्छ न देता पुस्तक भेट देणे या उपक्रमाचा गल्ली ते दिल्ली पर्यंतचा पायंडा त्यांनी पाडलेला आहे. पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल सर्वत्र अभिनंदन आणि शुभेच्छाचा वर्षाव होत आहे...

## उरण पंचायत समितीमध्ये दिव्यांगांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चासत्र संपन्न.

**पान १ वरुन**

ग्रामपंचायतीने घेणे,३)उरण पंचायत समिती मधील समाज कल्याण विभाग (टेबल) तळमजल्यावर असणे किंवा महिन्यातून एक ते दोन दिवस दिव्यांगांकरिता खाली यावे.४) ग्रामपंचायत, पंचायत समिती, समाज कल्याण विभागा मार्फत ५% निधी हा निर्देशांक फलकावर (नोटीस बोर्डवर) दरवर्षीचा प्रदर्शित करण्यात यावा. ५) तालुक्यातील ग्रामपंचायत हद्दीमध्ये असणाऱ्या कंपन्यांचे सीआरसी फंड मधील काही रक्कम दिव्यांगांच्या विकासासाठी वापरण्याची तरतूद करण्यात यावी. ६) दिव्यांगांना घरपट्टीत ५० % सवलत देणे इतर प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. या चर्चेमध्ये विस्तार अधिकारी विनोद मिंडे साहेब आणि महेश काळे साहेब यांच्या उपस्थितीत ग्रामसेवकांनी तसेच दिव्यांग सामाजिक संघटनेतील पदाधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा घडून आली. या सभेमध्ये काही ग्रामसेवकांनी त्यांना येणाऱ्या दिव्यांगांसोबत काम करताना अनुभव ही मांडले.

सदर उरण पंचायत समितीमध्ये माननीय बीडिओ साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार विनोद मिंडे सर (विस्तार अधिकारी) यांच्या अध्यक्षतेखाली महेश काळे सर (आवास योजना अधिकारी ) यांच्या उपस्थितीत तसेच उरण मधील सर्व ग्रामसेवक, सदिच्छा भेट देणारे सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार सर, त्याचबरोबर दिव्यांग सामाजिक संघटनेचे अध्यक्ष महेंद्र म्हात्रे, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, संघटनेचे सल्लागार मदन पाटील, सदस्य प्रकाश कोळी, रणिता ठाकूर, महेश पाटील, संदेश राजगुरू, मिलटन मिरांडा , इतर पदाधिकारी उपस्थित होते. सदर दिव्यांगांचे प्रश्न जाणून घेण्याकरता घेण्यात आल्यामुळे सर्व ग्रामसेवकांनी चांगल्या प्रकारे प्रतिसाद देत आम्ही दिव्यांगांकरता नेहमीच सहकार्य करू अशी ग्वाही दिली. त्याचबरोबर पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांचेही चांगल्या प्रकारे सहकार्य यापुढेही असेल. आणि दिव्यांगांच्या उत्कर्षासाठी नेहमीच आम्ही पुढाकार घेऊ असे मत व्यक्त करीत सदर सभेची सांगता करण्यात आली.







# ८ मार्च जागतिक महिला दिन...

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**

महिलांनी स्वतःच्या हक्कांसाठी दिलेल्या लढ्याच्या स्मरणार्थ दरवर्षी 8 मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून मोठ्या उत्साहाने जगभरात साजरा केला जातो.....

आपणही जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने 8 मार्च पासुन आठवडाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करून महिला दिन साजरा करणार हो ना.....?

आपल्या घरातील, ऑफिस मधील, आयुष्यातील कित्येक महिला आणि मुलींना प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष शुभेच्छा देवून, त्यांचे आभार मानून, चॉकलेट देवून, केक कापुन अशा विविध प्रकारे छोटे-मोठे कार्यक्रम घेवून, तिचा गुणगौरव करून अशा विविध प्रकारे महिला दिन साजरा करणार. खरंच याप्रकारे एक दिवस महिला दिनाच्या शुभेच्छा देवून, एक दिवस महिलेचा आदर करून, एक दिवस तिचे कौतुक करून, एक दिवस तिला सन्मान देवून खरंच महिला दिन साजरा होतो का....?

खरंच खऱ्या अर्थाने महिला दिन साजरा करायचा असेल तर नक्कीच पुढील गोष्टी अंगीकारून एक दिवस नाही तर वर्षाचे एकूण ३६५ दिवस महिला दिन साजरा करण्याचा प्रयत्न प्रत्येकांनी करावा.

१.



प्रत्येक दिवशी स्त्री चा आदर करा, सम्मान करा.
२. तिचा अपमान होईल असे वागु नका.
३. तिच्या कार्याचे/कर्तुत्वाचे कौतुक करा, तिला प्रोत्साहन दया.
४. तिने उत्कृष्ट कार्य (कुठल्याही क्षेत्रात) केल्यास नक्कीच तिच्या पाठीवर कौतुकाची थाप दया.
५.अडचणीच्या वेळी तिला मानसिक आधार देवून मदतीचा हात दया.
६. तिने केलेल्या स्वयंपाकाला कृपया नावं ठेवू नका.
७. ST बसने/खाजगी वाहनाने प्रवास करीत असतांना वयोवृद्ध, गरोदर महिला उभी दिसल्यास त्यांना बसायला जागा दया.
८. महिलांना अपमानजनक वागणूक देवू नका.
९. तिच्यावर कधीही हात उचलु नका.
१०. हुंडयासाठी कुठल्याही महिलेला त्रास देवू नका.
११. मुलीच्या जन्माचे स्वागत करा.
१२. मुलाला आणि मुलीला समान वागणूक दया.
१३. एकटी स्त्री ही संधी नाही तर जबाबदारी समजा.
१४.कुठल्याही महिलेची फसवणूक करू नका.
१५. घर सांभाळणाऱ्या आणि नोकरी करणाऱ्या महिलांना समान वागणूक दया.
१६. महिलांना कधीतरी घरातील एक-दोन कामात मदत करून बघा.
१७. तिलाही स्वतःचे मत मांडू दया, तिच्याही मताचा आदर करा.
१८. घरातील निर्णय प्रक्रियेत तिलाही सहभागी करून घ्या.
१९. आपल्या घरातील प्रत्येक महिला आणि मुलींना उंच भरारी घेण्याचे बळ दया.

बघा यापैकी काही जमतेय का...

**कु.मोनाली छाया शांताराम धुर्वे**

# ८ मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिवस

## "महीला सुरक्षित तर देश सुरक्षित,देश सुरक्षित तर जग सुरक्षित"

८ मार्च आंतरराष्ट्रीय महीला दीवस हा महीलांसाठी प्रेरणादायी ठरला पाहिजे.कारण जगातील महिलांनी पुर्वीच्याकाळी काय संघर्ष केला आणि आता कसा संघर्ष करावा लागत आहे याची आठवण ८ मार्चच्या निमित्ताने दिसून येते.महीला दिनाच्या निमित्ताने महीलांच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारने व आम नागरिकांनी स्विकारली पाहिजे. कारण महीला ही प्रत्येकांची आई,मुलगी,बहिण,पत्नी,वैनी, आत्या, मामी, माउशी, आजी, सुन,सासु,काकु इत्यादी मानसन्मानाची उपमा व पद आहे त्याचे पालन सर्वांनीच करायला हवे.यामुळे महीलांमध्ये व समाजामध्ये मोठी उर्जा निर्माण होवून एक नवीन चालना मिळुन शकते.देशात किंवा जगात महीलांची एक महत्वपुर्ण भुमिका असते.आज देश स्वतंत्र्या पासुन तर देशाच्या विकासापर्यंत महीलांचा मोठा हातभार लागला आहे.देश विकासाच्या दृष्टीकोणातुन आज महीला अग्रेसर आहेत.परंतु २१ व्या शतकात महीला स्वतःला असुरक्षित समजतात ही चिंताजनक बाब आहे.आज महीला सुरक्षा विभाग,खेळ विभाग, उद्योग क्षेत्र आणि अनेक सरकारी व खासगी क्षेत्रात महिला मोठ्या दीसुन येतात.अनेक निवडणुकांमध्ये महीलांसाठी आरक्षणसुध्दा आहे. परंतु पुरूष प्रधान देशात राजकीय पुढाऱ्यांनी महीलांना अजुनपर्यंत पुर्ण स्वतंत्र दील्याचे दीसत नाही.लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये अजुन पर्यंत महीलांना सरकारने आरक्षण जाहीर केले नाही.ही महीलांच्या प्रती शोकांतिकाच म्हणावी लागेल.खालच्या स्तरावरील निवडणुकांमध्ये महीलांना आरक्षण आहे ही स्वागतार्ह बाब आहे.परंतु उच्चस्तरीय राजकारणात सरकारने महीलांना कोसो दुर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.भारतात रनरागीनी झाशीची राणी लक्ष्मीबाई पासुन तर आतापर्यंत महीलांनी देशाला स्वातंत्र्याकरीता, सुजलाम्-सुफलाम करण्याकरीता आणि देशाला विकासाच्या नविन शिखरावर नेण्याचे काम भारतीय महीलांनी नेहमीच केले आहे ही आनंदाची,गौरवाची व अभिमानास्पद बाब आहे.त्याच प्रमाणे देशहीताच्या कामासोबत भारतीय संस्कृतीचे जतन कसे केले पाहिजे याची शिकवणसुध्दा "महीलांपासुनच"सर्वांना मिळत असते.कथेच्या माध्यमातून किंवा गोष्टींच्या आधारे वृध्द महिला बालगोपालांना "संस्कृतीचा"पाठ शिकवित असतात.म्हणुनच देश घडविण्याकरीता पुरूषांचा जीतका वाटा आहे तीतकाच वाटा महीलांचा आहे.त्यामुळे ८ मार्च हा दीवस महीलांसाठी नविन दीशा ठरणारा सिध्द व्हायला पाहिजे.सेवाभावी संस्था, डॉक्टर,नर्स,पायलट, वकील,जज, पोलिस विभागा आणि आता महीलांना आर्मीमध्येसुध्दा मोठ्या प्रमाणात प्राधान्य देण्यात येत आहे.म्हणजेच आजची महीला पुरूषांच्या बरोबरीने चालुन देशाला नवीन दीशा देण्याचे काम करीत असल्याचे मी समजतो.पुर्वी महीलांना अनेक क्षेत्रात स्वतंत्र नव्हते. परंतु आधुनिक युगात महीला सक्षम आहे.त्यामुळे संपूर्ण क्षेत्रात महिला अग्रेसर असल्याचे दिसून येते.महीला राष्ट्रपती,महीला मुख्यमंत्री,महीला प्रधानमंत्री, वैज्ञानिक, लोकसभा अध्यक्ष, पोलिस कमिशनर,अंतराळवीर,इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण पदांवर महीला विराजमान होत्या, आहे आणि पुढेही राहु शकतात याला नाकारता येत नाही. महीलांच्या या महत्त्वपूर्ण पदांमुळे भारतात महीलांनी इतिहास सुध्दा घडविला आहे. माओवादग्रस्त भागासाठी आदीवासी भागातील माडिया जमातीतील डॉ.कोमल मडावी ही एक प्रेरणादायी महीला ठरली तीची स्तुती कराल तीतकी कमी पडेल.आज भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात महिलांनी आपले नाव लौकीक केले आहे. राजकारण, समाजकारण, सुरक्षा, चित्रपट सृष्टी, खेळजगत,आर्मि, वैज्ञानिक, शास्त्रज्ञ, वैमानिक इत्यादीसह अनेक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर सुध्दा महीलांनी भरारी मारली आहे आणि प्रत्येक देशातील महीलांनी आपल्या देशाचे नाव लौकीक करून सुवर्ण अक्षरांनी कोरले आहे. भारतीय महीलांनी सर्वच स्तरात उंच भरारी मारली आहे त्याचसोबत भारतीय संस्कृती टीकवुन ठेवण्याची महत्वपूर्ण भुमिका भारतीय महिलांचीच आहे.महीलांचा वाढता विकास ही बाब भारताच्या दृष्टीकोनातून व जगाच्या दृष्टीकोनातून स्वागतार्हबाब आहे.परंतु भारतात महीलांवर वाढते अत्याचार रोखण्यासाठी देशातील राज्य सरकारे असमर्थ असल्याचे दिसून येते.या करीता महीलांवरील वाढता अत्याचार पहाता सरकारने "फास्ट ट्रॅक"कोर्ट अंमलात आणुन महीलांवर होत असलेले अत्याचार यावर अंकुश लावला पाहिजे.कारण आजच्या(सोशल मिडियाच्या) मोबाईलच्या युगामुळे महीलांवरील अत्याचार वाढत आहे.कारण महीलांवरील अत्याचार पहातो किंवा ऐकतो तेव्हा अंगावर शहारे येतात अशा अनेक घटना भारतात घडलेल्या आहे.मुलींचे अपहरण, अत्याचार किंवा त्यांची हत्या यावर पुर्णतः अंकुश लावण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय महीला दीवसाच्या निमित्ताने महीलांच्या सुरक्षेला सर्वात जास्त प्राधान्य सरकारने द्यायला पाहिजे. "महीला सुरक्षित तर देश सुरक्षित,देश सुरक्षित तर जग सुरक्षीत" तेव्हाच खऱ्याअर्थाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाला महत्त्व येईल.मानवाने मानुसकीचे पालन केले तर महीलांवरील अत्याचारावर आपोआपच अंकुश लागु शकतो. ज्या प्रमाणे महीला मुलांचे संगोपन करते त्याचप्रमाणे महीलांच्या सुरक्षेची जबाबदारी मानवाने स्वीकारली पाहिजे. तेव्हाच महीला सुरक्षित राहू शकतात. कारण महीलांवरील अत्याचार हा गंभीर आणि चिंतेचा विषय आहे. त्यामुळे देशाच्या व जगाच्या दृष्टीकोनातून ही धोक्याची घंटा आहे.आज भारताचा विचार केला तर महीला अत्याचाराच्या लाखो केसेस कोर्टामध्ये प्रलंबित आहेत आणि महीलांवरील अत्याचाराच्या अनेक केसमध्ये "तारीख पे तारीख"असा लपंडाव सुरू आहे. त्यामुळे गुन्हेगारांना वेळेवर सजा व पिडीतेला वेळेवर न्याय मिळत नाही ही शोकांतिका आहे.यावरून स्पष्ट होते की आजच्या परिस्थितीत महीला सुरक्षित नाही.८ मार्च महीला दीवसाचे औचित्य साधून भारतासह संपूर्ण जगाने महीला सुरक्षेचा "संकल्प"केला पाहिजे आणि महीलांच्या खांद्याला खांदा लावून बरोबरीची वागणूक दिली पाहिजे. महीलांचा सन्मान म्हणजे नारी जातीचा सन्मान,नारी जातीचा सन्मान म्हणजे देशाचा सन्मान,देशाचा सन्मान म्हणजे आंतरराष्ट्रीय महीला दीनाचा सन्मान.यातच खऱ्याअर्थाने महीला सशक्तीकरण दीसुन येईल.म्हणुनच म्हणतात "बेटी बचाव बेटी पढाव". महीला देवी-देवतांच्या सान्नीध्यात राहुन आपला परीवार मंगलमय कसा राहील या दीशेने त्यांचे कार्य सुरू असते व संपूर्ण परीवाराची एक महीला आशेचे किरण घेऊन सर्वांना सावरण्याचा प्रयत्न करीत असते.त्यामुळे महीला उन्हात सावली देण्याचे,हीवाळ्यात उब देण्याचे काम परिवाराला करीत असते.त्यामुळे प्रत्येक महीलेला देवीच्याच रूपात पहायला पाहिजे.आज रशिया -युक्रेन युध्दा दरम्यान आपला देश वाचवीण्यासाठी आरपारची लढाई लढत आहे. यासाठी मुख्यत्वेकरून त्यांच्या पत्नींनी व मुलींनी सैनिकांचे मनोबल वाढवीले आहे.म्हणजेच मानसाचे मनोबल व धौर्य वाढवण्यासाठी महीलांची अतुट शक्ती असल्याचे दिसून येते. असे माझे स्पष्ट मत आहे.आंतराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महिलांना मी आग्रह व विनंती करतो की जगात व देशात वाढते प्रदूषण व जंगलतोड पहाता आजच्या दिवसाला प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे. यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल. यामुळे सर्वांना शुद्ध हवा, ऑक्सिजन, सावली व गुरांना चारा मिळण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल.जय हिंद!

लेखक.
रमेश कृष्णराव लांजेवार.
(माजि विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## महाजनवाडी गावातील शेतकऱ्यांचे सोयाबीन आणि कडबा शार्ट सर्किटने जळुन खाक

# शेतकऱ्याचे अंदाजे लाखांचे नुकसान :- डॉ.गणेश ढवळे

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -**

बीड तालुक्यातील मौजे महाजनवाडी येथे दि.७ मार्च शुक्रवार रोजी दुपारी २ वाजता शार्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीमुळे येथील गट नंबर २१७ मधील शेतकरी बाबासाहेब लक्ष्मण घरत यांचे १५ क्विंटल सोयाबीन आणि २०० ज्वारीचा कडबा असे एकुण ६५ हजार रूपयांचे नुकसान झाले तर लगतच्या गट नंबर २१६ मधील शेतकरी राणुबाई रामचंद्र शिंदे यांच्या शेतातील सोयाबीन १० क्विंटल अंदाजे किंमत ४० हजार रुपये शार्ट सर्किटमुळे जळाले. महावितरणच्या गलधान कारभारामुळे हि आग लागुन नुकसान झाल्याने आम्हाला नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. या घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी फोनवरून तहसीलदार चंद्रकांत शेळके, महावितरणचे अभियंता अभिजित शिंदे आणि नेकनुर पोलीस स्टेशनचे स.पो.नि.चंद्रकांत गोसावी यांना फोन वरून कल्पना दिली. नेकनुर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे यांनी घटनास्थळी भेट देऊन स्थळ पंचनामा केला.

## सीकेटी महाविद्यालयात करिअर विषयक मार्गदर्शन सत्राचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी करिअर विषयक मार्गदर्शन सत्र रविवार, दि. ०९ मार्च २०२५ रोजी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगु काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (स्वायत्त), खांदा कॉलनी येथील महाविद्यालयात आयोजित केले आहे. महाविद्यालयात प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून मा. श्री. प्रशांत ठाकूर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली "करिअर व रोजगार" विषयक वेगवेगळे उपक्रम राबवित असतात. त्याचाच एक भाग म्हणून या सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

इयत्ता बारावी आणि पदवी नंतरच्या "करिअरच्या संधी" या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी चाणक्य मंडल परिवार, पुणे चे विश्वस्त आणि न्यूफ्लेक्स टॅलेंट सोल्युशन्सचे संचालक डॉ. भूषण केळकर यांचे मार्गदर्शन सत्र व विद्यार्थी संवाद रविवार, दि. ०९ मार्च २०२५ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता होणार आहे. प्रस्तुत कार्यक्रमाच्या अनुषंगाने महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील आणि प्लेसमेंट सेलचे अध्यक्ष प्रा. एस.एस. कांबळे यांनी पनवेल व सभोवतालच्या परिसरातील महाविद्यालयांचे प्राचार्य आणि विद्यार्थी प्रतिनिधी यांना निमंत्रित केले आहे तसेच विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन सत्रात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## भारतीय राज्यघटनेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त

### वीर वाजेकर महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सवाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**कॉलेज कट्टा/आरती सुरवसे**

उरण फुंडे येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर



वाजेकर महाविद्यालयात विवीध उपक्रमांच्या माध्यमातून संविधान गौरव महोत्सवाच्या अंतर्गत विवीध स्पर्धात्मक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर महोत्सवाअंतर्गत वक्तृत्व व निबंध स्पर्धांच्या उद्घाटन प्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ आमोद ठक्कर यांनी संविधानाचे महत्व सांगून संविधानाची जागृती करणे हे विद्यार्थ्यांचे कर्तव्य असून या स्पर्धांच्या माध्यमातून संविधानाचा आभ्यास करणे अपेक्षित असल्याचे मत व्यक्त केले.

यावेळी राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ संदीप घोडके यांनी आपल्या मनोगतात महोत्सवात सहभागी विद्यार्थ्यांनी संविधानाचा बाऊ न करता संविधान अधिक समजावून घेण्यासाठी योग्य पद्धतीने आभ्यास करण्याची आवश्यकता व्यक्त केली, कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतीक विभागाच्या प्रमुख डॉ. सुजाता पाटील यांनी केले तर प्रा. योगेश कुलकर्णी यांनी आभार मानले. हर्षिता घरत,निखिल प्रजापती आदी विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केले. सदर वक्तृत्व व निबंध स्पर्धेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

# मा.खा.भास्करराव पाटील खतगावकर साहेबांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची सहविचार सभा पार पडली आहे

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड -: बिलोली तालुक्यातील शंकरनगर येथे राज्याचे माजी मंत्री तथा मा.खा. भास्करराव पाटील खतगावकर साहेब यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची सहविचार सभा पार पडली आहे या सहविचार सभेला उपस्थित राहून डॉ.मीनलताई निरंजन पाटील खतगावकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेत सर्वसामान्य कार्यकर्त्यांना न्याय देण्याच्या भूमिकेतून काम करणार आणि आदरणीय दादा जो कार्यकर्त्यांसाठी निर्णय घेतील तो मान्य करू असा विश्वासही व्यक्त केला.याप्रसंगी आदरणीय दादा आणि आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनीही उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा,माजी आमदार मोहन अण्णा हंबर्डे, माजी आमदार अविनाश घाटे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी,माजी सभापती व्यंकटराव





पाटील गोजेगावकर,प्रदेश सरचिटणीस वसंत सुगावर,राष्ट्रवादीचे शहर अध्यक्ष जीवन पाटील घोगरे, बाळासाहेब पाटील खतगावकर, माजी सभापती प्रवीण पाटील चिखलीकर,माजी सभापती शिवराज पाटील होटाळकर, माजी उपमहापौर सरजीतसिंघ गिल,माजी उपसभापती अशोक पाटील मुगावकर,विश्वंभर पवार,डॉ.विक्रम देशमुख तळेगावकर,विद्यार्थी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शिवचंद्र डांगे, उपाध्यक्ष नागनाथ पाटील सावळीकर, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा सौ. सुरेखा पाटील,उपाध्यक्ष सौ.स्वरा मराठे,गंगाधर भांगे,रणजीत पाटील हिवराळे तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बिलोली, ज्ञानेश्वर पाटील कदम तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी उमरी,व्यंकट पांडवे,सभापती रवी पाटील खतगावकर,दीपक पावडे,मंगल देशमुख आलुरकर,संचालक हनमंत पाटील बामणीकर,मोहित पाटील सुगावकर, शिवाजीराव धर्माधिकारी,सभापती बाबाराव भाले,साईनाथ पाटील निवळे,संतोष चंदनकर,सभापती आनंदराव बिराजदार गुरुजी,रावसाहेब पाटील शिंदे,गंगाधर नरोड,दिगंबर पाटील खंडगावकर,दत्ता पाटील,सदाशिव पाटील डाखोरे,गंगाधर नरवाडे,बालाजी माळेगावे,मारुती दगडे,माधव वाघमारे,रावसाहेब मोहिते, बालाजी भोसले,विठ्ठल माने, रमेश मंगनाळे,संतोष पाटील पुयड,नंदू पाटील रातोळीकर,गजानन पाटील मुजळगेकर,श्रीपत पाटील शिंदे मांजरमकर, जयराम पाटील बाभळीकर,दत्ता हरी पाटील कावलगुडेकर,राजेंद्र पाटील कार्लेकर,निळकंठ पाटील शिंदे,राजेंद्र कापावार,शिवाजी पाटील जाधव कृष्णूरकर,सुधाकर महाराज लोहगावकर, रमेश पाटील शेटकर,गजानन पाटील भोसले,यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कु.सय्यद फिरदोस सिराज चा पवित्र रमजान मधील पहिला रोजा पुर्ण केला.

**दैनिक युवक आधार**
**(शेख महेशर)**



- मुस्लिम धर्माच्या पवित्र रमजान महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व असुन या महिन्यात मुस्लिम समाजातील लहान चिमुकल्यांना वगळून इतर सर्वांना रोजा (फर्ज) सक्तीचे आहे. परंतु घरात पालकांचे पाहून घरातील लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा धरतात. अश्याच प्रकारे वाळुज, (छ.संभाजीनगर) येथील सय्यद फिरदौस सिराज या चिमुकलीने त्यांच्या आयुष्यातील पहिला रोजा काटेकोरपणे पुर्ण केला. या वर्षीचा पवित्र रमजान महिना शनिवार दिनांक ०१ मार्च २०२५ रोजीच्या सायंकाळी चंद्रदर्शनाने आरंभ झाला असून या पवित्र रमजान महिन्याचा पहिला रोजा रविवार दिनांक ०२ मार्च रोजी होता. या पवित्र माहे रमजान मधील आपल्या आयुष्यातील पहिला रोजा वाळुज,ता.गंगापूर (छ.संभाजीनगर) येथील इयत्ता पहिली च्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या कु.सय्यद फिरदोस सिराज (वय ०६ वर्षे ) यांने धरला. या चिमुकलीने दिवससभर अन्नाचा कण व पाण्याचा एक थेंबही न घेता काटेकोरपणे आपल्या आयुष्यातील पहिला रोजा यशस्वी पुर्ण केल्या बद्दल अल्ताफ भाई, गनी भाई सय्यद, मिनाज सय्यद, फेरोज सय्यद, अफरोज सय्यद, अमर सय्यद, अलि भाई सय्यद, सिकंदर भाई सय्यद, अजहर पटेल, शेख नदीम, शेख अफसर भाई, असिफ शेख यांच्या सह सर्व नातेवाईक, मित्र परिवार व इतरांनी त्यांचे कौतुक व अभिनंदन केले असून शुभेच्छा दिल्या आहेत.

# जनजागृती सेवा संस्था"लोकमत एक्सलन्स अवॉर्ड२०२५ने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी-**
**गुरुनाथ तिरपणकर**

गेल्या चार वर्षात जनजागृती सेवा संस्थेने उत्कृष्ट कार्य केलेले आहे.वृध्दाश्रम,बालकाश्रम,मतिमंद मुलांना मदत,आश्रमांना जीवनावश्यक वस्तूचे वाटप,कोरोना काळात गरीब गरजु व्यक्तींना मदत,तसेच आदिवासी पाड्यावर दिवाळी फराळ वाटप,कपडे वाटप,शिवजंयती उत्सव,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती,महिला दिन,शिक्षक दिन,पत्रकार दिन,संस्थेचा वर्धापनदिन,महिला सक्षमिकरण,नवरात्रोत्सवात नवदुर्गांचा सन्मान,रक्तदान शिबिरात सहभाग,म्युझिक मंत्राच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रम,वृक्षारोपण,स्वच्छता अभियान असे विविध समाजउपयोगी उपक्रम संस्थेने यशस्वीरित्या राबविले आहेत.गेल्या चार वर्षातील या उत्कर्ष कार्याची दखल लोकमत वृतपत्र समुहाने घेतली.आणि जनजागृती सेवा संस्थेची"लोकमत एक्सलन्स अवॉर्ड२०२५साठी निवड केली. कफपरेड येथील प्रेसिडेंट हॉटेल मधील आलीशान अशा प्रशस्त सभागृहात विधानसभेचे अध्यक्ष आदरणीय श्री.राहुलजी नार्वेकर,आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकरजी



उद्योग व मराठी भाषा मंत्री उदयजी सामंत यांच्या हस्ते"लोकमत एक्सलन्स अवॉर्ड२०२५हा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांना समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.याप्रसंगी संस्थेचे खजिनदार दत्ता कडुलकर हेही उपस्थित होते.तसेच लोकमत वृत्तपत्र समुहाचे वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.जनजागृती सेवा संस्थेने कणकवली,मालवण,चिपळूण,सावर्डे,कोंड माळा,मांडकी या ग्रामीण भागात तसेच कर्जत,वांगणी,बदलापूर,अंबरनाथ,कल्याण,डोंबिवली,ठाणे, मुंबई शहर-उपनगर येथे विविध समाजउपयोगी उपक्रम राबविले आहेत.या सर्व ठीकाणी संस्थेचे कार्यकर्ते कार्यरत आहेत.त्यांच्या सहकार्या-यानेच कार्यक्रम यशस्वी करणे शक्य होत आहे. पुणे,बारामती,इचलकरंजी,यवतमाळ येथील संस्थाचे कार्यकर्ते कार्यक्रम घेण्यास उत्सुक आहेत.त्यांच्या बहुमोल सहकार्याने भविष्यात तेथे ही कार्यक्रम घेतले जाणार आहेत.जनजागृती सेवा संस्थेचे पदाधिकारी,सदस्य,सल्लागार तसेच जनजागृती सेवा संस्थेचे ग्रुप सदस्य यांचे मार्गदर्शन व सहकार्यामुळे उपक्रम राबविणे शक्य होत आहे.हा अवॉर्ड सर्वांचा आहे.म्हणून"लोकमत एक्सलन्स अवॉर्ड२०२५हा जनजागृती सेवा संस्था ग्रुप सदस्यांना समर्पित केला आहे असे संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी आवर्जून सांगितले.

# रमजान महिना सुरू असल्याने मशिदीबाहेरील खाद्यपदार्थांच्या हात हातगाड्यांवर कारवाई नको

**दैनिक युवक आधार**
**पुणे वार्ताहर**

रमजान महिना सुरू असल्याने मुस्लिम बांधव संध्याकाळी नमाज पठणासाठी मशिदीत येत आहेत, त्यामुळे परिसरात काही गोरगरीब फळांसह खाद्यपदार्थांच्या हातगाड्या लावत आहेत, परंतु महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून या हातगाड्यांवर कारवाई केली जात आहे, ही कारवाई तातडीने थांबवण्यात यावी, अशी मागणी मुस्लिम बांधवांच्या वतीने पुणे महानगरपालिकेतील माजी नगरसेवक रफिक शेख यांनी केली आहे, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ राजेंद्र भोसले यांना त्यांनी याबाबतचे निवेदन दिले आहे, इस्लाम धर्मात पवित्र रमजानला अनन्यसाधारण महत्व आहे या महिन्यात मुस्लिम बांधवांकडून निरंकार रोजे (उपवास) केले जातात, रोजा बरोबरच नमाज, कुराण पठण, विशेष प्रार्थना आदींमार्फत परमेश्वराची इबादत केली जाते, त्यामुळे मशिदीबाहेरील हातगाड्यांवर कारवाई करू नये अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे, मुस्लिम बांधवांच्या विनंतीस मान देऊन आयुक्त डॉ राजेंद्र भोसले यांनी मशिदी बाहेरील हातगाड्यांवर कारवाई न करण्याचे आश्वासन दिल्याचे माजी नगरसेवक रफिक शेख यांनी सांगितले

***************



# सदर व्यक्ती हरवलेली आहे.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :-संदेश बांदल**



संतोष विकी लठाड
वय वर्ष 24 जात आदिवासी
सध्या राहणार घोटवलं इंदापूर पंजाबी ढाबा माणगांव रायगड
मु. पोस्ट विश्वि ता. मेहकर जि. बुलढाणा चेहरा उभंट,उंची सुमारे 5 फूट 3 इंच
फुल बाह्याचा शर्ट काळ्या रंगाची पॅन्ट त्यावर केसरी रंगाचा फुल बाह्याचा शर्ट पायात चप्पल
सदर व्यक्ती कोणाला आढल्यास माणगांव पोलीस स्थानकात कळवावे

## बेकायदेशीर दगडखाणी विरोधात मुख्यमंत्री यांच्या निवासस्थानी ५ मार्चला काढलेला आदिवासी बांधवाचा मोर्चा पोलीसांनी आडवला..

# पोलीस व आदिवासीमध्ये पेटली संघर्षाची ठिणगी ; शेवटी, बेकायदेशीर दगडखाणी मालकांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्याचे दिले आदेश..

**दैनिक युवक आधार**
**पनवेल / प्रतिनिधी :**

पनवेल शहराच्या हक्काच्या अंतरावर राहणाऱ्या आदिवासींचे बेकायदेशीर दगडखाणीमुळे जगणं अवघड झाले आहे. या बेकायदेशीर दगडखाणी कायमस्वरूपी बंद करण्यासाठी अनेक वर्षापासून या आदिवासींचा लढा आहे. बेकायदेशीर दगडखाणीमुळे आदिवासींना जीव मुठीत घ्यावा लागतोय, परंतु करोडो रुपयांचा महसूल दगड खाणीचे मालक आणि महसूल विभागाचे अधिकारी यांच्या संगमताने महसूल बुडवला आहे. या संदर्भात अनेकदा पत्रव्यवहार तहसील, प्रांत कार्यालय,पोलीस विभाग, सिडको, जिल्हाधिकारी यांना केला होता व आहे.

मात्र या दगड खाणीवर कोणताही परिणाम झाला नाही शेवटी 5 मार्च 2025 रोजी टेंभोडे आदिवासीवाडी, वळवली सागाचीवाडी, वाघऱ्याचीवाडी येथील आदिवासी बांधवांनी मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी व मंत्रालयासमोर आपल्या परिवारासह आत्मदहन करण्याचे पत्र पोलीस विभागाला व संबंधित विभागाला दिले होते. आज शेकडो आदिवासी बांधव मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी पायी जात असताना खांदेश्वर पोलीस विभागाने अडवण्याचा प्रयत्न केला. मात्र आमच्या मागण्या पूर्ण करा, नाहीतर बेकायदेशीर चालवत असणाऱ्या दगड खाणीच्या मालकावर गुन्हे दाखल करा परंतु संबंधित सिडको व महसूल विभागाच्या लातूर-मातूर आश्वासनाने येथील आदिवासी बांधव आक्रमक झाले. नंतर पोलीस आणि आदिवासी बांधवांमध्ये संघर्षाची ठिणगी पडली; या संघर्षामध्ये



आदिवासी महिलांना धक्काबुक्की लागली तर काही आदिवासी महिलांचे कपडे फाटल्याने पुरुष पोलिसांवर आदिवासींचा अधिक आक्रोश पाहायला मिळाला मात्र जमीन हक्क परिषद महाराष्ट्र राज्याचे माऊली सोनवणे यांच्या मध्यस्थीतीने आदिवासी बांधव आणि पोलिसांमधला संघर्ष मिटवण्यात आला.

सिडको महापालिका महसूल विभागाचे अधिकारी लेखी आश्वासन पत्र घेऊन घटनास्थळी आले. तात्काळ दगड खाणी मालकाच्या विरोधात गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिल्याने संघर्षाची पडलेली ठिणगी शांत झाली. यावेळी जमीन हक्क परिषद महाराष्ट्र राज्याचे माऊली सोनवणे व त्यांचे पदाधिकारी, आंदोलनाचे नेतृत्व जोमी गिरा व समाजसेवक संतोष चाळके, बी. पी. लांडगे, पत्रकार गणपत वारगडा, सामाजिक कार्यकर्ते डी. के. भोपी जयवंत शिद, हिरामण नाईक, बाळू वाघे, जोमा मधे वाघाऱ्यांचीवाडी, सागवाडीतील शेकडो आदिवासी बांधव उपस्थित होते.

## सिल्लोड तालुका परिसरात गहू काढणीला वेग - हार्वेस्टर यंत्राचा वापर वाढला

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

सिल्लोड तालुक्यात शेतकरी गव्हाचे पीक मोठ्या प्रमाणात पिकवत असतात. सध्या गहू काढणीला वेग आला असून शेतकरी गहू काढणीस मग्न आहेत. मात्र मजुराद्वारे गहू काढणे आता बंद झाले असून आधुनिक हार्वेस्टर यंत्राद्वारे कमी वेळात गहू काढण्यासाठी शेतकरी जास्त प्राधान्य देत आहे.

यावर्षीच्या सुरुवातीपासूनच चांगल्या प्रमाणात पाऊस झाल्याने गव्हाची पेरणी मागच्या वर्षीच्या प्रमाणात जास्त पहावयास मिळत आहे. सध्या गव्हाचे पीक पक्व झालेले आहे. निसर्ग कधी कोपल हे सांगता येत नाही .वरून राजा कधी हजेरी लावेल हे सांगता येत नाही .अचानक पावसाने हजेरी लावली तर काढणीस आलेला गहू पिकाच मोठ नुकसान होईल या चिंतेत शेतकरी आहे.पूर्वी पारंपरिक पद्धतीने गव्हाची मळणी केल्यास सुरुवातीला गहू कापून त्याच्या पेंढ्या बांधल्या जात होत्या. नंतर गव्हाची मळणी केली जात होती. यामध्ये शेतकऱ्यांना जास्त मेहनत करावी लागत होती. तसेच, मजुरांची जुळवाजुळव करून त्यांची मजुरी द्यावी लागत होती. हे काम वेळखाऊ होते. मात्र, गेल्या काही वर्षापासून परराज्यातून येणाऱ्या हार्वेस्टर यंत्राला मोठी मागणी वाढली आहे.

* हार्वेस्टर मुळे मजूर वर्ग अडचणीत *

शेतकरी आपल्या शेतात आधुनिक यंत्र, मशीनद्वारे शेती पिके लागवड व काढत आहे. तेच शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या परवडत असल्याने शेतकऱ्यांचा कल हा मशीन आणि यंत्रसामग्री वापरूनच शेती करण्याकडे आहे.

> जमिनीचे क्षेत्र कमी झाल्याने अनेकांनी बैल जोड विकल्या परिणामी वेळेवर पेरणी करायला ट्रॅक्टर बोलवावे लागते. यांत्रिकीकरण वाढल्याने आता पारंपारिक सोगणी, मळणी फारशी होत नाही. आधुनिक हार्वेस्टरनेच गहू काढण्याकडे सर्वांची पसंती आहे.
> **अंबादास चापे, शेतकरी अन्वी**

गहू काढण्याच्या हार्वेस्टर यंत्रामुळे मजूर लावून हाताने गहू काढणे आता बंद झाले आहे . शेतकऱ्यांचा जास्तीत जास्त कल हा हार्वेस्टर मशीनने गहू काढण्यासाठी जात आहे. मशीन मुळे गहू कमी वेळात काढणे होत असल्याने मजुरांना पैसे देऊन आपला वेळ खर्च का करावा हा प्रश्न शेतकरी करत आहे. परिणामी मजुरांच्या हाताला काम मिळत नाही. असे चित्र आहे. सध्या अनेक



# पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या वतीने जागतिक महिला दिन साजरा

## वैद्यकीय क्षेत्रामध्ये रुग्णसेवा देणाऱ्या कर्तृत्ववान डॉक्टर महिलांचा केला सत्कार



**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या वतीने शुक्रवार दिनांक 7 मार्च रोजी जागतिक महिला दिनाच्या पूर्वदिनी वैद्यकीय क्षेत्रामध्ये रुग्णसेवा देणाऱ्या कर्तुत्वावर महिला डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. तसेच प्राणिक हिलिंग प्रणालीच्या माध्यमातून रुग्णसेवा देणाऱ्या कर्तुत्ववान महिलांना देखील यावेळी सन्मानित करण्यात आले. रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा समजून समर्पण भावनेतून समाजसेवा करणाऱ्या कर्तुत्ववान महिला डॉक्टरांना यावेळी शाल,श्रीफळ, सन्मानपत्र पुष्पगुच्छ आणि श्रीमद् भगवद्गीतेची प्रत देऊन सन्मानित करण्यात आले. सामाजिक क्षेत्रात सक्रिय असणारी पत्रकारांची नोंदणीकृत संस्था म्हणून पनवेल तालुका पत्रकार विकास मंच प्रचलित आहे. तब्बल दोन दशकांहून जास्त कालावधीत पनवेल तालुका पत्रकार विकास मंच यांच्या वतीने दुर्गम क्षेत्रातील विविध जिल्हा परिषद शाळांच्यातून शैक्षणिक साहित्य वाटप, आरोग्य शिबिरे, अभ्यास दौरे, सन्मान संध्या असे समाजोपयोगी कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने प्रत्येक वर्षी कर्तृत्ववान महिलांचा सन्मान केला जातो. यंदाचे वर्षी जागतिक महिला दिनाचे निमित्ताने वैद्यकीय क्षेत्रामध्ये अतुल्य योगदान देणाऱ्या डॉ.जयश्री पाटील,डॉ. समिधा गांधी, डॉ. विशाखा म्हात्रे, डॉ. कांचन पाटील वडगावकर, डॉ मानदा पंडित यांना सन्मानित करण्यात आले.तर प्राणिक हिलिंग या प्रणालीच्या माध्यमातून रुग्णसेवा देणाऱ्या सौ. अर्चना विवेक पाटील आणि सौ मेघना संजय कदम यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी सत्काराला उत्तर देताना डॉक्टर जयश्री पाटील म्हणाल्या की आज स्त्रीने स्वतःची प्रकृती सुदृढ ठेवणे जितकं महत्त्वाचं आहे तितकंच महत्व तिने आपल्या सुरक्षेला देखील दिले पाहिजे. भारतीय न्याय संहितेच्या 498 कलमाच्या अनुषंगाने प्रत्येक स्त्रीने आपल्या सुरक्षेच्या दृष्टीने असलेल्या कायद्याचे अध्ययन केले पाहिजे. त्या म्हणाल्या की पनवेल तालुका पत्रकार विकास मंच नेहमीच आगळे वेगळे उपक्रम राबवत असतो. हृद्य सत्कार केल्याबद्दल त्यांनी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे मनःपूर्वक आभार मानले. तर सौ मेघना संजय कदम यांनी प्राणिक हिलींग बाबत उपस्थितांना अवगत केले. तसेच स्पर्श आणि औषध विरहित ही उपचार पद्धती काळाची गरज असल्याचे सांगितले.

यावेळी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे सल्लागार तथा ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, अध्यक्ष मंदार दोंदे, सल्लागार विवेक पाटील, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, खजिनदार संजय कदम, दत्तात्रय कुलकर्णी,राजू गाडे,सुनील राठोड,वैभव लबडे आदी सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

पनवेल तालुका पत्रकार मंच हेतू पुरस्सर पणे जागतिक महिला दिनाच्या पूर्वदिनी कार्यक्रम साजरा करत असतो.ज्यायोगे सत्कार मूर्तींना जागतिक महिला दिन त्यांच्या मनाप्रमाणे व्यातीत करता यावा. पुस्तक भेट स्वरूपात देण्याचा कटाक्ष आम्ही आवर्जून पाळतो. सत्कार मूर्तींच्या कार्यक्षेत्री अथवा त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना सन्मानित करणे ही देखील मंचाची खासियत आहे.

...मंदार दोंदे, अध्यक्ष,
पनवेल तालुका पत्रकार विकास मंचर

# महा बँकेतील कर्मचारी आंदोलनाच्या पावित्र्यात

**दैनिक युवक आधार नवीन पनवेल वार्ताहर**

महाबँकेतील कर्मचारी आंदोलनाच्या पवित्र्यात बँकिंग उद्योगातील बहुसंख्य असलेली संघटना ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशनशी



संलग्न असलेली संघटना ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज फेडेरेशनने सध्या बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये आंदोलन पुकारले आहे. ह्या आंदोलनाच्या शृंखलेत आज बँकेच्या भारत भरातील सर्व झोन मध्ये निदर्शने देण्यात आली. ह्या अनुषंगाने बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज मुंबईने आज बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये मुंबई येथील झोनल ऑफिस मध्ये निदर्शने करण्यात आली.

याप्रसंगी ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशनचे उपाध्यक्ष एन. शंकर, बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष, अरविंद मोरे, जनरल सेक्रेटरी, सुधीर पाटील व संघटन सचिव, पांडुरंग भोगले आदी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्ष, अरविंद मोरे यांनी संघटना ही बँकेत कर्मचाऱ्यांची लिपिक, शिपाई, पी.टी.एस. भरती, डी ज्युरी कराराची अंमलबजावणी, द्विपक्ष बोलणी, कोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी, स्पेशल असिस्टंट पदाच्या जागा भरणे व ताब्यात घेतलेली युनियन ऑफिस परत मिळविण्या करीत आंदोलन करत असल्याचे सांगितले. याप्रसंगी ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशनचे उपाध्यक्ष एन. शंकर म्हणाले की बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियन ही खरोखर योग्य मागण्यासाठी आंदोलन करीत आहे. संघटनेचे आंदोलन हे देशभक्तीचे आंदोलन आहे कारण की, ते ग्राहकांना चांगली ग्राहक सेवा मिळण्यासाठी आंदोलन करत आहेत. त्यांच्या ह्या आंदोलनामुळे बँकिंग संघटनेतील आंदोलनांना एक नवी दिशा मिळेल. जनरल सेक्रेटरी सुधीर पाटील यांनी जर मागण्या पूर्ण झाल्या नाही तर २० मार्च ला संप करून आंदोलन अधिक तीव्र होईल असे सांगितले. संघटन सचिव पांडुरंग भोगले यांनी ह्याच आंदोलनाच्या शृंखलेत संघटना १७ मार्चला बँकेच्या हेड ऑफिस लोकमंगल, पुणे येथे धडक मोर्चा नेणार असल्याचे सांगितले. निदर्शनात बँकेतील कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन आपला असंतोष निदर्शनाच्या माध्यमातून दर्शविला.

# एम-आरएनए (mRNA) -आधारित लसींसाठी भारत आणि बेल्जियमची भागीदारी

## बेल्जियन इकॉनॉमिक मिशन अंतर्गत टेकइन्व्हेन्शन आणि क्वांटूम बायोसायन्सेस यांच्यात सामंजस्य करार

दैनिक युवक आधार
सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)

मुंबई, मार्च २०२५, भारताच्या जैवतंत्रज्ञान क्षेत्रात मोठी भर टाकणारी घोषणा नुकतीच करण्यात आली आहे. टेकइन्व्हेन्शन लाइफकेअर प्रा. लि. (TechInvention) आणि बेल्जियममधील क्वांटूम बायोसायन्सेस (Quantoom) यांनी एक महत्त्वपूर्ण भागीदारी केली आहे. या सामंजस्य करारावर (MoU) ४ मार्च २०२५ रोजी बेल्जियन इकॉनॉमिक मिशन अंतर्गत स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या ऐतिहासिक क्षणी बेल्जियमच्या राजकन्या, हर रॉयल हायनेस प्रिन्सेस अस्ट्रिड, तसेच दोन्ही देशांतील उद्योग क्षेत्रातील दिग्गज आणि तज्ज्ञ उपस्थित होते.

भारतासाठी नवी संधी ही भागीदारी भारतातील जैवतंत्रज्ञान क्षेत्रासाठी एक मोठी झेप आहे. मुंबईत टेकइन्व्हेन्शनच्या 'ग्लोबल कोलॅबोरेटिव्ह सेंटर फॉर मेडिकल काउंटरमेझर्स' (GCMC) मध्ये ईयू-जीएमपी मान्यताप्राप्त उत्पादन सुविधा उभारली जात आहे, जिथे पूर्ण क्षमतेने एम-आरएनए (mRNA) आधारित औषधांचा विकास होईल. फक्त मानवी आरोग्यासाठी नाही, तर पर्यावरणासाठीही उपयुक्तही भागीदारी केवळ मानवी आरोग्यापुरती मर्यादित नाही, तर प्राणी व पर्यावरणाच्या दृष्टीनेही उपयुक्त ठरणार आहे. क्वांटूमचे तंत्रज्ञान पर्यावरणपूरक व कमी कार्बन फूटप्रिंट असलेल्या (mRNA) उत्पादनांसाठी विकसित करण्यात आले आहे. यामुळे जागतिक पातळीवर mRNA-आधारित लसी आणि औषधे अधिक कमी दरात उपलब्ध होतील, विशेषतः कमी आणि मध्यम उत्पन्न गटातील (LMICs) देशांसाठी हा मोठा बदल ठरणार आहे. जोस कॅस्टिलो, सीईओ, क्वांटूम बायोसायन्सेस, म्हणाले:"आमचा उद्देश म्हणजे mRNA-आधारित लसींचा विकास वेगाने पुढे न्यायला मदत करणे. आमच्या N-Force टूलबॉक्सच्या मदतीने, mRNA उत्पादने अधिक मोठ्या प्रमाणात आणि कमी खर्चात तयार करता येतील. भारतासारख्या मोठ्या आणि महत्त्वाच्या बाजारपेठेत टेकइन्व्हेन्शनसोबत भागीदारी करणे हा आमच्या उद्दिष्टांसाठी एक मोठा टप्पा आहे. या भागीदारीतून mRNA आधारित औषध क्षेत्रात अनेक नवी दारे उघडली जातील." सय्यद अहमद, संचालक आणि सीईओ, टेकइन्व्हेन्शन, म्हणाले:"क्वांटूमच्या अत्याधुनिक mRNA तंत्रज्ञानाच्या मदतीने भारतामध्ये औषध आणि लसीकरणाच्या क्षेत्रात नवे पर्व सुरू होत आहे. ही भागीदारी केवळ भारताच्या नव्या पिढीतील जैवतंत्रज्ञान क्षेत्राला चालना देणार नाही, तर भविष्यातील साथींचा सामना करण्यासाठी देशाची तयारीही मजबूत करेल. तसेच, संपूर्ण LMICs देशांना mRNA -आधारित नाविन्यपूर्ण उपचार सहज आणि परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देईल."भारत जैवतंत्रज्ञानाच्या पुढच्या पर्वासाठी सज्ज ही भागीदारी भारताला mRNA-आधारित तंत्रज्ञानाचा जागतिक केंद्रबिंदू बनवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. आरोग्यविषयक नवकल्पनांना चालना देत ही संधी जागतिक स्तरावर समतोल आणि कमी दरात आरोग्यसेवा प्रदान करण्याच्या दिशेने एक मोठी झेप घेईल.







# ३०० हून महिला पोलिसांची मोफत आरोग्य तपासणी

## मदरहूड हॉस्पिटलचा अनोखा उपक्रम - सीबीसी,कॅल्शियम, थायरॉईड, पॅप स्मीअर आणि बोन मिनरल डेन्सिटी तपासून तज्ज्ञांनी केले मार्गदर्शन






**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

महिला पोलिस अधिकारी कायदा सुव्यवस्था सांभाळण्याचे काम करतात. त्यामुळे त्यांचे आरोग्य चांगले राखणे हे आपले कर्तव्य आहे. येत्या आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त खारघरच्या मदरहुड हॉस्पिटलने नवी मुंबई येथील पोलीस मुख्यालयात महिला पोलिसांची मोफत आरोग्य तपासणी केली. या शिबिरातंर्गत सुमारे ३०० महिला पोलिस कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यात आली. या प्रसंगी पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे आणि डीसीपी रश्मी नांदेडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. महिला पोलिसांनी त्यांच्या आरोग्याबाबत जागरुक रहावे आणि वेळेवर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविता याव्यात यासाठी रुग्णालयाने संपूर्ण रक्त गणना (सीबीसी), कॅल्शियम, थायरॉईड पॅनेल, पॅप स्मीअर आणि बोन मिनरल डेन्सिटी (बीएमडी) चाचणी यासारख्या आवश्यक चाचण्या केल्या. मदरहूड हॉस्पिटलने याठिकाणी महिला पोलिसांची आरोग्य तपासणी करत महिला त्यांच्या आरोग्याविषयक समस्या दूर करण्यासाठी तसेच त्यांना जागरुक या विशेष उपक्रम राबविला. रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांची टिम ज्यामध्ये डॉ. प्रतिमा थमके, डॉ. सुरभी सिद्धार्थ, डॉ. अनुजा थॉमस आणि डॉ. श्रुती उग्रन यांचा समावेश होता. त्यांनी महिला पोलिसांची तपासणी करत त्यांच्या शंकांचे निरसन करुन योग्य मार्गदर्शन केले. व्यस्त वेळापत्रक, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि नोकरीमुळे महिलावर्ग अनेकदा स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. गंभीर आजारांचे वेळीच निदान आणि व्यवस्थापन करण्यासाठी प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी महत्त्वाची भूमिका बजावते. डॉ. प्रतिमा ठमके( प्रसूती आणि स्त्रीरोगतज्ज्ञ, मदरहूड हॉस्पिटल, खारघर) सांगतात की, महिला पोलिस हे त्यांचे जीवन समाजाची सेवा आणि संरक्षण करण्यासाठी समर्पित करतात आणि ही सेवा करताना बऱ्याचदा त्या त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या आव्हानात्मक नोकरीची जबाबदारी पार पाडताना त्यांना त्यांच्या आरोग्याला प्राधान्य देण्यासाठी फारसा वेळ नसतो, ज्यामुळे संभाव्य आरोग्य समस्यांकडे दुर्लक्ष केले जाते. मासिक पाळी दरम्यान असामान्य रक्तस्त्राव, सतत पोटदुखी, अनियमित मासिक पाळी, ओटीपोटात अस्वस्थता, पोट फुगणे किंवा थकवा यासारख्या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्याने फायब्रॉइड्स, ओव्हेरियन सिस्ट, एंडोमेट्रिओसिस, हार्मोनल असंतुलन, थायरॉईड विकार किंवा अगदी सुरुवातीच्या टप्प्यातील कर्करोगाचे निदान होऊ शकते. पॅप स्मीअर्स, थायरॉईड पॅनेल, हाडांच्या आरोग्यासंबंधी चाचण्या आणि रक्त तपासणी यासारख्या नियमित तपासणीमुळे संभाव्य धोके वेळीच ओळखण्यास मदत होते आणि वेळीच उपचार करण्यास मदत होते. खारघर येथील मदरहूड हॉस्पिटल्सच्या फॅसिलिटी डायरेक्टर डॉ. रूपाली कदम सांगतात की, आमचा असा विश्वास आहे की महिलांनी, विशेषतः नोकरदार महिलांनी घरी व कामाच्या ठिकाणी त्यांचे कर्तव्य बजावण्याबरोबरच आरोग्यालाही विशेष प्राधान्य दिले पाहिजे. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त या उपक्रमाद्वारे, आम्ही प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या आवश्यक तपासणीद्वारे, आम्ही महिला पोलिस कर्मचाऱ्यांना समाजासाठी त्यांचे कर्तव्य पार पाडत असताना त्यांच्या स्वतःच्या आरोग्याकडेही तितकेच गांभीर्याने लक्ष देण्याचा सल्ला दिला

# सुधागड तालुक्यातील नवघर असरे येथील श्री गणेश मंदिराचा कलशारोहण कार्यक्रम... भाविकांनी श्रवण सुखाचा लाभ घ्यावा---- निमंत्रक व व्यवस्थापक

**दैनिक युवक आधार**
**सुधागड वार्ताहर**



सुधागड तालुक्यातील नवघर येथे श्री कुलस्वामिनी गणेश मंदिर कलशारोहण सोहळा .. नवघर येथील श्री गणेश मंदिराचा कलशारोहण कार्यक्रम फाल्गुन शुद्ध दशमी रविवार दिनांक ९/३/ २०२५ रोजी आयोजित केला आहे तरी सर्व भाविकांना कळविण्यात आनंद वाटते की श्री बल्लाळेश्वराच्या कृपाशीर्वादाने व ग्रामस्थ मंडळ नवघर यांच्या मार्गदर्शनाखाली नवघर येथील श्री खरे यांच्या गणेश मंदिराचा कलशारोहण सोहळा व त्यानिमित्त रात्री महाप्रसाद व महाराष्ट्रातील पहिले छत्रपती शिवाजी महाराज मंदिर निर्माते ह. भ. प. राहुल महाराज पारठे (भोर पुणे )यांचे सुश्राव्य कीर्तन संपन्न होत आहे तरी सर्व भाविकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाचे शोभा वाढवावी व महाप्रसादाचा आणि श्रवण सुखाचा लाभ घ्यावा ही विनंती श्री. व सौ. वैशाली राजेश मापारा व व्यवस्थापक -- ग्रामस्थ मंडळ महिला मंडळ नवघर यांच्या वतीने करण्यात आले आहे महाप्रसाद सायंकाळी ६.३० ते ८.०० वा .नंतर किर्तन रात्री ९.०० वाजता होईल.